म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.

वि. म. कुलकर्णी



REFBK-0011234
REFBK-0011234

# भाववीणा

# भा व वी णा

[ गीतें व कविता ]

वि. म. कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 19238

किंमत १ रुपया

REFBK-0011234
REFBK-0011234

व्हीनस प्रकाशन : पुणें

• प्रथमावृत्ति : ऑक्टोबर १९६०
• सर्वाधिकार प्रकाशकांचे स्वाधीन

• या पुस्तकांतील कविता म्हणणें,
ध्वनिमुद्रण इत्यादि हक्क लेखकाकडे
• मुखपृष्ठ
श्री. अनंत सालकर

• प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार पेठ : पुणें २

• मुद्रक
भा. ल. कोकाटे
हनुमान प्रेस
७१८ सदाशिव पेठ : पुणें २

## दोन शब्द....

— मी वेळोवेळीं लिहिलेलीं कांहीं भावगीतें व माझ्या कवितांपैकीं कांहीं गेय कविता यांचा हा छोटासा संग्रह आज प्रसिद्ध करीत आहें. हेतु हा कीं, गायनकलेच्या साह्यानें कवितेंतील भाव खुलविणाऱ्यांच्या हातीं तो असावा.

यापूर्वीं, अनेक काव्यगायकांनीं व गायिकांनीं माझीं पुष्कळशीं कवनें "ऑल इंडिया रेडिओ" च्या निरनिराळ्या केंद्रांवरून, विद्यामंदिरांतून किंवा अन्य प्रसंगांच्या निमित्तानें, स्वरांकित व ध्वनिक्षेपित केलीं आहेत. या सर्व परिचित-अपरिचित गायक-गायिकांचे मी मनापासून आभार मानतों. आपल्या सुमधुर व भावपूर्ण स्वरांनीं अलंकृत करून त्या त्या गायकांनीं माझी कविता माझ्या-पुढें उभी केली, तेव्हां माझ्या श्रवणांना आणि मनाला आनंद वाटला. उचित गेयता व लयबद्धता हा काव्यांतील भाव खुलविणारा गुणच होय, यात संदेह नाहीं. 'गीत' हा काव्यप्रकारहि अलीकडे थोडाफार रूढ होत आहे, यांतील मर्म हेंच होय.

प्रस्तुत संग्रहांत एकत्रित केलेल्या कवितांतील व गीतांतील कांहीं थोडीं जरी रसिकांना व काव्य-भक्तांना प्रिय झालीं, तरी माझ्या श्रमाचें चीज झालें.

या छोट्या संग्रहाचे शेवटीं कांहीं अभंग दिले आहेत. वास्तविक, 'अभंग' हा वाङ्मय-प्रकार संतकवींनीं इतक्या उच्च कोटीला नेऊन ठेविला आहे कीं, त्या पायरीला हात लावण्याचाहि आमचा अधिकार नव्हे. पण आत्म-समाधानासाठीं वेळोवेळीं सुचलेले हे अभंगोद्गार कोणा समानधर्मी रसिकाच्या सहभावना कंपित करतील या कल्पनेनें येथें सादर करीत आहें, एवढेंच. कवितेस चाल लावून म्हणतांना, काव्यगायनाचे वेळीं, कांहीं कडवीं किंवा काव्यपंक्ति गाळतात. असें करतांना क्रमभंग न होईल असें पहावें म्हणजे झालें.

आमचे प्रकाशक-मित्र श्री. स. कृ. पाध्ये यांचे आभार मानण्यांत मला आनंद वाटतो.

दयानंद कॉलेज, सोलापूर
१५-१०-१९६०

— वि. म. कुलकर्णी

# अनुक्रम


१ माझा महाराष्ट्र
२ कृतज्ञता
३ यात्रा
४ माय मराठी
५ घरट्यास
६ ये झुलुक
७ चल पाहू चांदणें
८ पानमळा
९ अधीर
१० पाळणा टांगिला
११ सखये तू रमणी
१२ ये वसंत हांसत
१३ पहांटवारा
१४ ढग आले
१५ माझा उजळ उंबरा
१६ दिसशी आज निराळी
१७ कधि तनू सांवरूं
१८ फुलें गुलाबाचीं
१९ पलित्याची ज्योति
२० बघ जीवन वाहे
२१ निर्धार
२२ ही लहर लहर
२३ फुले मोगरा
२४ तीन दगड मांडिले
२५ बघशी वाट कुणाची
२६ येथेंच ना
२७ सतार
२८ वारुळाला
२९ कवीची कहाणी
३० राधिके
३१ हांक
३२ महात्माजींस
३३ ललकार
३४ नवें पाणी
३५ चालले आम्ही पुढें
३६ द्रौपदी
३६ वठलेल्या वृक्षास
३८ दिंडी निघाली माघारीं
३९ आला संतांचा मेळा
४० मंत्र–पुष्प
४१ प्रार्थना

अनुक्रम .................... नों: दि: ..........
क्रमांक ....................

## माझा महाराष्ट्र

माझा महाराष्ट्र, माझा महाराष्ट्र,
माझा महाराष्ट्र हा सुंदर ध्रु०

गोदावरी कोयना आणि कृष्णा
भली चंद्रभागा इथें वाहते
इंद्रायणी येथ देवाघरींची
गाथा मराठी शिरीं झेलिते ! १

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ..........
शाखा

पूर्णा सुखाची, तशी वैनगंगा
गाताति या गायनें सुंदर
उभा धीरगंभीर सह्याद्रि मागें
पुढें नाचतो हा महासागर २

किती कोट किल्ले उभारून छाती
कथा सांगताती अजुनी जुनी;
माता भवानी अम्हां रक्षणारी
राजे शिवाजी प्रतापी गुणी. ३

मराठी पहा आमुची एक भाषा
हें अमृताचें असे ताट हो !
घेऊं सुखें घास एका दिलानें
तो धर्मपंथी कुणीहि असो. ४

ज्ञानामृताचे घडे घेउनिया
समर्थासवें नाथ, ज्ञानेश्वर;
वीणा करीं घेति नामा–तुकोबा
अभंगांतुनीं बोलवी विठ्ठल ! ५

गीता प्रभूची जगा सांगणारे
इथें गाजले बाळ गंगाधर,
येथें महात्मा फुले, भीमराव,
कानांवरी येइ त्यांचा स्वर ! ६

हा भारताचा भुजदंड आहे
ध्वजा भारताची उभारीतसे !
महाराष्ट्र हा शूर स्वातंत्र्यप्रेमी
छातीवरी वार झेलीतसे ७

इथें भक्ति, शक्ती, इथें देशप्रीती
हें कीर्ति, प्रीती सुखाचें बन,
नवीं पुण्यक्षेत्रें फुलतात येथें
याला असो आमुचें वंदन ! ८

* * *

कृतज्ञता

तव मायेची बा खूण पटून
मम अन्तर आलें प्रभो भरून ! ध्रु०

अन्धाराच्या जगतामाजीं
दृष्टि हरपली होती माझी
तूं दीप ठेविला पथिं उजळून
मम अन्तर आलें प्रभो भरून १

शिणतां काया वणवण श्रमुनी
विसांवतां मी माथा टेकुनि
बांसरी–नाद ये गोड कुठून
मम अन्तर आलें प्रभो भरून २

आशेचा मम दीप तेवतां
झंझावातें हा थरथरतां
तूं धरिला पदराआड जपून
मम अन्तर आलें प्रभो भरून ३

तव मायेची गर्द साउली
आणि साथ तव मला लाभली
हो प्रवास इथवर सुखें म्हणून
मम अन्तर आलें प्रभो भरून ४

घरटें अजुनी दूरदूरवर
दिवस बुडाला इथेंच हा तर —
वाली न दयाळा ! तुजवांचून
मम अन्तर आलें प्रभो भरून ५

* * *

## यात्रा

उगवला आतां नारायण !
अंधार दिशांना पळे — मोकळें होई हें त्रिभुवन ! ध्रु०
नभिं लुकलुक होत्या करीत तारा कुणी
त्या येणाऱ्याची हांक जागवित मनीं . . . .
त्याच्या स्पर्शें अंधाराची धार जाय वितळुन
उगवला आतां नारायण ! १

पांखरा कंठ, अन् प्राण मिळे मानवा,
गाइच्या गोजिऱ्या स्तनांत पान्हा नवा,
पूर्वेस रम्य मोतिया,–दुधाची सागरांत शिम्पण
उगवला आतां नारायण ! २

तो कृपावन्त ये वरती क्षितिजांतुन
टाकीत पाउलें चाले सरसावुन
उजळित ' अवघ्या वाटा ' होई तेजाची उधळण
उगवला आतां नारायण ! ३

भूमीचा कुसवा जणूं नव्यानें फुले
आगळें मुखावरि तेज तिच्या विलसलें....
वंदित ती या चरणां पावन, ओलावुनि लोचन
उगवला आतां नारायण ! ४

हा वेदकालिंही असाच उगवत असे
हा अर्घ्य मुनींचें युगानुयुग घेतसे —
तुम्हि अर्घ्य द्या न द्या, याची यात्रा चाले गगनांतुन !
उगवला आतां नारायण ! ५

* * *

## माय मराठी

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवीत !

ज्ञानोबांची – तुकयाची
मुक्तेशाची – जनाईची
माझी मराठी चोखडी
रामदास शिवाजींची !

' या रे या रे लहानथोर '
हांक मायमराठीची :
बंध खळाला गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची

डफ तुणतुणें बोलतें,
उभी शाहीरमंडळी !
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली

नांगराचा चाले फाळ
अभंगाच्या तालावर,
कोवळीक विसावली
पहांटच्या जात्यावर !

—नव्या युगाची ' तुतारी '
कुणी ऐकवी जगाला,
कुणी अर्पी ' मधुघट '
कुणी ' निबंधांची माला ! '

लेक लाडका एखादा
गळां घाली ' वैजयन्ती; '
मुक्त प्रीतीचे, क्रान्तीचे
कुणी नजराणे देती

—हिचें स्वरूप देखणे
चाल हिची तडफेची
हिच्या नेत्रीं दाटे प्रभा
सात्त्विकाची, कांचनाची !

कृष्णा – गोदा – भीमाजळ
हिची वाढविती कान्ती,
आचार्यांचे आशीर्वाद
हिच्या मुखीं वेद होती !

— माझ्या मराठीची थोरी
नित्य नवें रूप दावी
अवनत होई माथा
मुखीं उमटते ओवी !

* * *

## घरट्यास

तूझ्याच साउलींत मी पाहिला प्रकाश ।
दारीं बसून तूझ्या न्याहाळिलें जगास ॥

येथेंच चिवचिवाट केला हळू मुखानें ।
येथेंच जीवनाचें म्हटलें सुरेल गाणें ॥

वाऱ्यांत वादळांत पोटीं तुझ्या सुखानें ।
मी राहिलों निवान्त निश्चिंतशा मनानें ॥

होता विशाल पंख जाणे निघून दूर ।
आतां तुझ्या स्मृतींनीं येतो भरून ऊर !

माया मऊ पिसांची आतां कुठून भाळीं ?
नेत्रांतल्या दिव्यांची ती कोठली दिवाळी !

चोंचींत माउलीच्या घालून सान चोंच ।
खाणें फिरून केव्हां ते घास मी तसेच ?

आशा पराक्रमाची चित्तामधें धरून ।
आतां खुल्या वितानीं उंचावरी फिरेन ॥

हुरहूर या जिवाला ही मात्र लागणार ।
माया तुझ्या पिसांची केव्हां न लाभणार ॥

* * *

**ये झुळुक....**

ये झुळुक सकाळीं अशी कुठून ....
मन बघे उठून, हें बघे उठून !

आकाशामधिं मिणमिणणारे
दिवे रात्रिचे विझले सारे
काजळि त्यांची—तीही ओसरे
ये प्रकाश कवळा हा उमटून !
ये झुळुक सकाळीं अशी कुठून ?

—भरुनि घडा कीं ओढ्यावरती
घरा परतली कुणी ‘ पार्वती ’
थेम्ब जळाचे हिन्दकाळती
ही लहर तिला ये, ये लगटून !
ये झुळुक सकाळीं अशी कुठून ?

सडा शिम्पिला मनांत कोणी
किणकिणणाऱ्या गौर करांनीं ?
आणि रेखिली काय बाजुनी
नव–रंगवल्लिका चिमुट मिटुन !
ये झुळुक सकाळीं अशी कुठून ?

काय धन्याची नजर चुकवुनी
वत्स बिलगतां स्तना, धावुनी
पान्हा फुटला सर्वांगांतुनि !–
तें प्रेम हवेवर ये प्रगटून !
ये झुळुक सकाळीं अशी कुठून ?

—मी तर नुसता बघतों हांसत
कुठें, कशावर, चित्त विसांवत....
हात प्रभूचा कीं गोंजारत—
मज म्हणतो, “ वत्सा ! पहा नटून ! ”
ये झुळुक सकाळीं अशी कुठून ?

* * *

## चल पाहूं चांदणें

चल सजणे, चल सजणे !
चल पाहूं चांदणें ! ! ध्रु०

गगनिं उगवला रजनीनाथ
सख्या तारका घेउनि सोबत,
कृष्णगोपिका नाचताति कां, रासाचीं नर्तनें ?

नारळिच्या छायेंत बसूं या
प्रीतीच्या मायेत हंसूं या
किरणांच्या संगतीं बोलुं या, नवलाचें बोलणें !

विसरूं या घर, हें घटकाभर
विसरूं मनिंची अवघी घरघर
चांदण्यांत होउं या हर्षभर, या चंद्राच्या गुणें....

—अथवा जावें कशास बाहिर ?
तूंच चंद्र मम हें जगजाहिर !
चंद्र-रोहिणिस घरिंच बोलवूं प्रीतीचे पाहुणे ! !
चल सजणे, चल सजणे चल पाहूं चांदणें !....

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स
अनुक्रम ........................ वि: ......
क्रमांक ........................ नों: दि: ....

## पानमळा

माझा पानमळा – पानमळा !
इथुन तिथुन, काळीशार होती धरणी
मी वाफे पाडुन, कांडे मोडुन केली पेरणी
अंकुर कवळाऽ कवळाऽ. . . . कवळा कवळा— १

दिवसामासापरी अंकुर वरी वरी वाढे
नागवेल शेवरीवरी विळखा मारी आणि चढे
पिकला सोनसळा. . . . सोनसळा — २

‘ कापुरओढ्यावर ’ माझी विहिर, काय नखरा;
बादशाहि चार मोटा चालती, खोटा नाहीं झरा
पाणी कावळ्याचा डोळा. . . . अहो डोळा !— ३

समद्या शिवारांत जित्रापांत मळा झुले
हा पख पिसारुनी खुल्या मनीं मोर डुले !
दिल तर हरखला. . . . हरखला ४

धरतिची केली निगा कशी बघा देवापरी
कमि नाहीं दौलतीला लक्षिमीला आणिन घरीं !
बढती माझ्या कुळा. . . . माझ्या कुळा ! ५

या, राव ! बसा तरी देतों घरीं मुंबईखुडा
द्या घरधनीणिला रंगवायाला ओठकडा !
तुमचा पिकेल मळा. . . . पिकेल मळा ! ! ६

* * *

## अधीर

अधीर ओठ ते तुझे
न बोलतांच थांबले;
बोलल्याविनाहि तूं
भाव मन्मनीं फुले !

दिसेल शुभ्र चांदणी
वाटलें असें मना,
तोंच तोंच कोणता
मेघ आड ये पुन्हां ?

धुंद नेत्र ते परी
पाहती – न पाहतां
एवढे न का कळे
मला गडे अजाणतां !

मनांतलें मनांतही
मुकाट राहिना कसें
पापणींत दडविसि तें
भ्रुकुटिंतुनि वर विलसे ....

इवल्या या ओठांनीं
भाव कसा वठवावा
त्यांची तर अन्य रीत;
निःशब्दच पटवावा !

* * *

## पाळणा टांगिला

पाळणा टांगिला
आज मधल्या घरांत
इवलाल्या चिमण्यांची
वर बसली पंगत !

रंगीत पाळण्याची
मला ग हौस मोठी–
झोपणार त्यांत कोण
माझा राजा जगजेठी !

लावा दाराला तोरण
पाळण्याला लावा फुलें,
फुलावाणी माझें बाळ
मला पाहूं द्या नटलें :

आधीं लावा कोणी तरी
बाळा काजळाचें बोट
इडापिडा टळो बाई
उगा लागायाची दृष्ट

" गोविंद घ्या ग कुणी, गोपाळ घ्या ग कुणी,"
सारें यथासांग करा
ओवाळा नीरांजन
बाळा निंबलोण करा,

कानांत करा ' कुर्रर ....'
' विचारून ' नांव ठेवा
हौस त्यांचीच ही सारी,
त्यांना,-सर्वांना, बोलवा !

—माझ्या ग लेकराच्या
घुगऱ्या गोड झाल्या,
आलें गालावर पाणी
त्यांत भिजूनिया खाल्ल्या !

पाळण्याच्या चिमण्यांनो,
रोज घास घास आणा,
वाढूं दे पाळण्यांत-
माझ्या कुशींचा पाहुणा !

* * *

## सखये तूं रमणी

सखये तूं रमणी, जिवाची, सखये तूं रमणी !

आजवरींची करितां वणवण
उदासलें, त्रासलें किती मन,
कांटे रुतले या हातांतुन
गुलाब ते गळुनी — जिवाची, सखये तूं रमणी !

सखि, तूं येतां, तुझिया संगें
वसंत आला जिववित अंगें
हर्षित, पुलकित मी झालों, गे,
जीवन हें बहरुनी, जिवाची, सखये तूं रमणी !

चंचल लोचन — स्थिर मज करिती
हास्यशलाका — चित्त विंधिती
मोहक विभ्रम — भ्रमीं पाडिती
कसली ही ' करणी ' ? जिवाची, सखये तूं रमणी !

— तूं हंसवावें — मी हांसावें
मोहसमाधिंत गुंगुनि जावें;
वेड, पिसें हें काय असावें —
सांगे प्रियकरिणी; जिवाची, सखये तूं रमणी !

* * *

## ये वसंत हांसत

ये वसंत हांसत हा नटुनी !
चल जाउं गडे, चल कुंजवनीं ॥.... .. ध्रु०

तरू तरू हे पालवले ग ऽ
शाखांवरतीं फुलें फुलें बघ
कुहू कुहूनें डुलें, झुलें जग
करुं साथ तयाला मनहारिणी !........ १

फिरूं पांखरांपरी वनांतुन
देहमनाचं विसरुनि भान
हांसत, खेळत, खुल्या दिलानं
अद्वैत अनुभवूं मधुर क्षणीं ........ २

दुःखांचा साहिला हिंवाळा
कष्टांनीं हा जीव थरकला;
आज मात्र हा वसंत आला
लुटुं निर्मळ सुख दोघे मिळुनि ........ ३

चल जाउं गडे, चल कुंजवनीं ॥

* * *

## पहांटवारा

झुळझुळता झुळझुळता ये पहांटवारा
मद, मधुर, गंध–रुचिर, जीव सुखविणारा

चंद्रासह पश्चिमेस मावळली रात
पदन्यास पूर्वेला करि लाजरी प्रभात
पाठ गायनाचे घेई, कोकिळा बनांत
कळ्या रेशमी वसनांच्या लेती शिणगारा

ग्रीष्माच्या तप्त, दग्ध भूमिवर वरून—
वळिवाचा पहिला पाऊस ये भरून,
माती ती शांत होत – फुलत मग फिरून !
गंध धुंद – तो – तसाच हा पहांटवारा

श्रान्त जीवनाचा सारा हारपला शीण
जग जागे होय अतां देखणें, प्रसन्न !
कुजबुजतो पाणवठा, किलबिलतें रान
घाटावरि नरनारी करिति येरझारा

—जग जागे होय अतां सखये, तूं ऊठ !
तुझिया नयनांत मला पाहुं दे पहांट,
सृष्टिहून तूं सुंदर सुप्रसन्न, शान्त
मधु श्वासाचा लाभो मज पहांटवारा !

* * *

## ढग आले

ढग आले, ढग आले, बघ सखये, आकाशीं
घेउनिया स्कंधावर निर्मळ जळराशी . . .

लेती कुणी शुभ्र वसन,
झाले कुणि श्याम, अरुण
गंधर्वांघरिंचे कुणि दिसति रहिवाशी !

— घट अपुले भरुन भरुन
ओतितील हें, जीवन
पृथिवीला भिजवितील या तुषारराशी !

कांटा उठवीत वात
रोमांचामधुनि गात,
छेडित जी वीणा मनिं लपली अविनाशी.

— कडकडतां वीज वरी
बावरसी किति सुंदरी,
भीतीनें प्रीतीच्या धरिलें पदराशीं !

हाताची सोड मिठी
बघ वरती करूनि दिठी
गोरें मुख भिजवाया मेघही अधाशी !
ढग आले, ढग आले, बघ सखये, आकाशीं !

* * *

## माझा उजळ उंबरा

शुभ मंगल वेळेला— साखि ! आज येसी घरा !
तुझ्या सोन्याच्या पाउलीं माझा उजळ उम्बरा !
गाई परतल्या घरां प्रेम घेऊन वासरां !
झाला गोरज — समय प्रेममुहूर्त हो खरा !
तुझ्या प्रीतिनिरांजनें लक्षदीप उजळती
तुझ्या नेत्रकटाक्षानें लक्षभाव उसळती . . .
अंत:पट होतां दूर अंतःकरणें मिळतीं !
नेमियेल्या स्नेहज्योती एकरूप एक होती ! !
सप्तपदें चालतांना सप्तजन्मांची सांगता
एका मंगलसूत्रानें बद्ध झालों उभयतां !
देवा—ब्राह्मणांसमक्ष दिली पदराला गांठ
हात घालून हातांत आतां चालायची वाट !
माहेरच्या परसांत खेळलीस ग, उदंड
सासरच्या अंगणांत चल नवा डाव मांड !!
गहूं भरलें हें माप तुझ्या स्पर्शें कर रितें
प्रेम भरलें अमाप हेंच मला तें दावितें
गृहलक्ष्मीचा प्रवेश आतां मज काय उणें ?
सौंदर्याची, संपदेची घरां आलीं त्रिभुवनें . . .
— सुवर्णाक्षता टाकून सूर्यराज गेले घरीं
परी चंद्र पौर्णिमेचा उदयला माझ्या दारीं !
आतां चांदणें जनांत आतां चांदणें मनांत
आतां माझ्या घरींदारीं चांदण्याची बरसात !!

## दिसशी आज निराळी !

दिसशी आज निराळी
सखि तूं दिसशी आज निराळी !

मंगलदिनिं, त्या मंगलकाळीं
रूपमती तूं रम्य, देखिली
आज झळाळी, दिसे आगळी, जादु काय घडली ?

हरिणीची चपळाइ लोपली
गति हंसीची कधीं घेतली
सोनसळीची अवचित कां गऽ चांफेकळी बनली ?

फूल उमललें वेलीवरचें
दूर राहिलें खुडावयाचें
कुरवाळिशि त्यां; निसर्गप्रीती कुठुनी प्रिया शिकली ?

पहात बससी पहांट–तारा,
अस्फुट कलिका उमलविणारा
तेजोगर्भा उषा पाहुनी, गुणगुणसी ओळी !

कौसल्येचीं, — नंदाघरचीं
गाणीं गाशीं गोविंदाचीं
जगन्माउली नयनामधिं तव आजच अवतरली !

* * *

## कशि तनू सांवरूं—

कशि तनू सांवरूं    कणकण निसरे वाळू
नच मेळ कशाला    खेळ कशाचा खेळूं ?  १

हे बहिरे भंवतीं    हांक कुणा मी मारूं ?
हें फुटलें, सांधूं    कुठें कुठें मी तारूं ?  २

पसरला सहारा    शोधूं जळ मी कोठें ?
गोवर्धन उचलूं ?    श्रीहरि माझा कोठें ?  ३

नच देव देउळीं    नाम कुणाचें गाऊं ?
हो दुभंग धरणी    हाय, कुठें मी राहूं  ४

ही अशी वेदना    कुठवर भोगायाची ?
मज दिसेल केव्हां    वाट दिव्य कळसाची ?  ५

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99237
शाखा (स्थळ प्रत)

## फुलें गुलाबाचीं—

फुलें गुलाबाचीं — आणिलीं दोन तुला द्याया
हर्ष जरी झाला — भासलें सारें तें वाया !

तुझ्यापुढें नेतां — फुलें हीं जातीलच सुकुन
संशय हा, माझ्या — घालतो मनांत थैमान

तुझिया गालींचा — गुलाबी विलास पाहून
गुलाब हे माझे — आपुला टाकितील वर्ण !

तुझ्या मुखावरचें — नाचरें सुहास्य देखून
प्रफुल्लता माझ्या — गुलाबां जाइल टाकून

आणिक श्वासाच्या — परिमलापुढतीं लाजून
वास फुलांचा या — क्षणांतचि होइल निष्प्राण !

तुझ्यापुढें नेतां — फुलें हीं जातीलच सुकुन
विरस असा होतां — चित्त मम होइल गे खिन्न !

खुळें परंतू तें — तयाला कोठुन कळणार—
म्लान परी 'माझीं' — फुलें तूं हृदयीं धरणार ! !

* * *

## पलित्याची ज्योती

जळती अन् जागती....
उभी मी, पलित्याची ज्योती !

अग्निकंकणाचें या बंधन
जन्मापासुन झालें भूषण !
सर्वस्वाचें अर्पुनि इंधन–
सर्वकाळ तेवती, उभी मी,
पलित्याची ज्योती ! १

पिसाट वारे माळावरचे
घोंगावत मज वेढायाचे !
राक्षस, वाटे दुष्ट मनाचे
नाचति बळिभोंवतीं ! उभी मी,
पलित्याची ज्योती ! २

जळत जळत हा देह चालला
परी तयाची खंत कुणाला ?
उजळत जोंवर दाहि दिशाला–
तेजकिरण फाकती, उभी मी,
पलित्याची ज्योती ! ३

* * *

बघ जीवन वाहे—

बघ जीवन वाहे खळखळुनी
आकंठ तुझा घट घे भरुनी

क्षणाक्षणाला चढतें पाणी
कणाकणांतुनि नवता आणी
कुंभ तुझा कां रिताच अजुनी ?
घडि गेली नच ये परतोनी
आकंठ तुझा घट घे भरुनी

तुझिया मार्गीं लावुनि डोळे
कोणी बसले अनाथ दुबळे
तयां पाजुनी जल घटांतलें
घे दुवा तयांचा तूं हंसुनी !
आकंठ तुझा घट घे भरुनी

होय जलाचें सिंचन जरि का—
अंगणांतल्या हसतिल कलिका
बहार येइल पारिजातका
आनंद-गंध हो दिशांतुनी
आकंठ तुझा घट घे भरुनी !

* * *

## निर्धार

नाव लोटली सागरीं
दूर राहिला किनारा
परतीरा पोंचायाची
ओढ लागली अन्तरा

नाव लोटली सागरीं
वाहे वादळाचा वारा
थरकांप सुटे चित्ता
कुठें धुण्डावा आसरा ?

नाव लोटली सागरीं
धांवत ही सैरावैरा
वावटळीमाजीं जणूं
फिरे पान गरागरा !

नाव लोटली सागरीं
होय आघातांचा मारा
लपलेल्या खडकांचा
मनीं सन्तत दरारा !

नाव लोटली सागरीं
उभा आहें मी सङ्गरा
पाठीराखा तूं उदारा !
जाईनची पैलतीरा

* * *

## ही लहर लहर........

हें फूल उमललें दिसतें गोजिरवाणें
माझिया जिवाला घाली गोड उखाणे !

या प्रखर उन्हाचा नाहीं ठावा ताप
हें प्रभातरंगीं खुलते आपोआप !

पाकळी गोजिरी याची थरथरणारी
दंवबिंदु झेलितां होते गोरीमारी.

आंतल्या आंत जो गंध याचिया दाटे
तो उमलायाच्या आधिंच जीवा भेटे

या वाटे – " माझ्यासाठीं जग हें नटलें,
हे सोनकिरण मजसाठिंच कीं प्रगटले !

मी मान झुकवितां तिकडे यावे यांनीं
या मातीवरच्या मातीच्या पुतळ्यांनीं "

– कोणि म्हणा हवें तें – मी तर झालों वेडा
फुलगंधानें मम मना घातला वेढा !

ही लहर लहर – हा बहर आगळा वाटे
मज मानवास अजि उर्वशीच कीं भेटे !

* * *

## फुले मोगरा !

तव सहवासीं फुले मोगरा,
फुले मोगरा ग !

हळुच मनांतुन सरकत जाती
भावांच्या रसभरल्या पंक्ती
मयूर कुठला खुषींत फुलवी आज पिसारा ग... ?
फुले मोगरा ग !

नसानसांतुन धुंदी भरली
मधुर वेदना,–तनु थरथरली
कोमल पानें लाजत मुरकत यति पुढारा ग....
फुले मोगरा ग !

क्षणांत फुलते जीवनलतिका
हंसती डुलती टपोर कलिका,
दूर कुठें अंतरीं विहरतो गंध कांपरा ग....
फुले मोगरा ग !

* * *

## तीन दगड मांडिले !

— तीन दगड मांडिले  आम्ही वळचणीखालीं
भर उन्हांत, साउली—  पाहूनिया ! १

— तीन दगड मांडिले  मध्यें अग्नि चेतविला
आंबेमोहोर वैरिला  लक्ष्मीनें ! ! २

— आंबेमोहोराचा गंध  घरादारांत दाटला-
वारा शीतळ सुटला  पश्चिमेचा ३

— वाऱ्यामधून वाहतो  आई तुझा आशीर्वाद
देवाघरचा प्रसाद  मला मिळे ४

— तीन दगडांमधून  उभी झाली इमारत
वर कळस डोलत  सोनियाचा ! ! ५

* * *

## बघसी वाट कुणाची ?

बघसी वाट कुणाची ?
सखि, बघसी वाट कुणाची ?....
तीं न पाउलें, अतां या घरां
कधीं वळायाचीं
प्यास जिवाची, वा नयनांची
कधि न शमायाची !
चंद्र मावळे, ज्योत्स्ना आतां
ती न फुलायाची
पद्मदळें तीं मिटलीं मिटलीं
कशीं खुलायाचीं ?
दूरदूरवर बघसी, मूर्ती दिसेल
का त्याची ?
चरणचाल योजिसी कुठें ग
धांव घ्यावयाची ?
सखे, खुळी समजूत करोनी
घेसी जीवाची !
पोषिसि वेडी कशास आशा ?
तीच तुला जाची !
बोलुनि थकले, कशी न निखळे
धुंदी नयनांची ?
कुणि मेल्यानें तुला भारिलें ?
नजर जळो त्याची ! ....

## येथेंच ना !

पहिलीच ओळख जाहली अन् हांसलों अन् लाजलों
चित्तीं मुदें उल्हासलों सखये, प्रिये, येथेंच ना ?

सहलूनिया येतां कधीं न्हाऊनिया जलसिंचनीं
मृत्तिकेच्या गोड गंधा— आस्वादिलें, येथेंच ना ?

वक्षावरी, अंकावरी वा टेकूनिया माथा कधीं
विसरूनिया मनयातना विश्रांतलों, येथेंच ना ?

मीं गीत वेडेंवाकुडें गाऊनिया तुज दाविलें
तूझा मला म्हणवूनिया गे, घेतलें, येथेंच ना ?

हृदयांतलीं, नयनांतलीं पुशितां कुणी हलु आंसवें !
ज्योत्स्ना फुलोनी राहिली ग्रीष्मांतही येथेंच ना ?

ही स्वप्नसृष्टि लोपुनी— जाईल हें स्वप्नीं नसे ?
" स्वप्न संपायाच जन्मे " सांगशी, येथेंच ना ?

येशील तूं केव्हांतरी — ! सांगून हें वेड्या मना
थांबूं कुठें चिरकाल मी— येथेंच ना ? येथेंच ना ?

* * *

## सतार

कां पुन्हां अशी छेडिसि सतार? ध्रु.

सुकला तुटला गुंफूं बघसी—
पुन्हां कशाला हार? १

लाज वल्कलांची तुज माझ्या
कनवाळू तूं फार...
प्रिया, कशाला आतां वसनें
देशी ही जरतार? २

विझले जे, विझविलेच जे, तें
उरीं कोळसे चार
चेतविसी का, पुन्हा राजसा
तोच लाल अंगार? ३

अतां उजाळा मिळावयाचा
दिन गेला रे दूर
परंतु अवघी जळून जाइन
होशी कां रे क्रूर? ४

पुन्हां दया ही नको दाखवूं
...नकोस छेडूं तार!
नकोस छेडूं तार!
कां पुन्हां अशी छेडिसि सतार? ५

* * *

वारुळाला—  [ लोकगीत ]

[ नागपंचमीच्या वेळीं स्त्रिया लेकीसुनांसह फेर धरून गाणीं म्हणतात. या गीतांतील एकेक कडवें निरनिराळी स्त्री म्हणत आहे अशी कल्पना. ]

पहिली— " चल ग पोरी खेळायाला  चल ग पोरी नाचायला
नागपंचमी सण आला  चला चला ग वारुळाला "

दुसरी— " श्रावणांतली धरणी ग  हंसते हिरव्या कुरणीं ग
दिसते नवरी तरणी ग  खेळूं खिदळूं हरणी ग "

तिसरी— " आंब्याच्या ग फांदीला  झोका माझा बांधीला
साखरपुडा ग झाल्याली  मी तर नहाण न्हाल्याली"

चौथी— " नव्या घरीं तूं जायाची  झोका औंदा घ्यायाची
थोडं राहिलं आभाळ  तोल बाइ तूं सांभाळ !"

पांचवी— " झोका घेतें मी सुवाशिण  वारं आलं सरसरुन
मागें बघतें फिरफिरुन  आलें उंचावर फिरुन "

सहावी— " झोका गला टोंकाला  काय दिसतं ग तिथुन तुला?
वाट माझ्या ग माहेराची ?  वाट माझ्या ग माहेराची?"

सातवी— " निळ्या नभाच्या अंगणीं उभी कां ग तूं चांदणी ?
ये ग राणी ! खेळायाला ये ग पोरी नाचायाला "

आठवी— " चला चला ग चला चला वारुळाला जाउं चला
लाही घेतली नागोबाला ! चल ग पोरी वारुळाला!"

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम .......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

## कवीची कहाणी !

गाउं कशाचें गान, शारदे ! गाऊं कशाचें गान ?
चकोर चातक आणि मंडळी
गुलाब, भुंगे अन् चाफेकळि
चंद्र, कोकिळा–सर्व संपलीं !
अतां नुरे अवसान, शारदे– !
होती माझी एकुळती ' ती '
रचिलीं काव्यें मीं तिजवरतीं
मम काव्यांनीं दडपुनि छाती
तिचा घाबरे प्राण, शारदे– !
' मी कवि ' ऐसे कळे पित्याला,
दिधली कन्या तयें दुजाला !
विषय मिळे ' मंगलाष्टकाला '
दिल्या छापुनी छान, शारदे– !
देशभक्त कुणि ' जाइ ' न अजुनी !
विरहगीत नाहींतर करुनी
मम फोटोसह आणिन छापुनि
असा मला अभिमान, शारदे– !
पुरा विसरलों या नादांत
गणेश–उत्सव समीप येत !
करीन काव्याची बरसात !
झालों बघ बेभान ! शारदे, गाऊं कशाचें गान ?

* * *

राधिके

पाणवठ्यावर जाशी तूं,
    पाणवठ्यावर जाशी ग !
सूर्य उतरला रथाखालतीं,
    चंद्राची हो सरशी ग
शिरीं तुझ्या हा घडा मातिचा
    त्यावर इवली कळशी ग
हंसगामिनी अशी कामिनी
    अजि चंचल कां ठुमकाशि ग
संशय कसला मनांत तुझिया
    वळणावर कां वळशी ग ?
पथींच थांबुन मुरकुन मुरडुन
    कवणाला तूं बघशी ग ?
तुझेच पैंजण करिती रुणझुण
    नाद मुरलिचा म्हणशी ग !
श्रीहरि कोणी घडा फोडुनी
    भिजविल भीति मानिशि ग ?
भिजलें मन....मग भिजेल तनु, ही
    खंत कशाला करिशी ग ?
    तूं पाणवठ्यावर जाशी ग !

* * *

हांक—

विठ्ठला, आलों मी दारीं
आलों मी दारीं

उघड उघड बा, कवाड मिटलें
तुजसाठीं मन तिळतिळ तुटलें.
संसारांतुनि उठुनी आलों मजला स्वीकारी
दयाघन, आलों मी दारीं... १

तुझ्याचसाठीं अंगणांतलें
तुलसीदल हें जपुनि आणिलें;
साठविलें मी जल नयनींचें किती दिसांचे तरी!
दयाघन, आलों मी दारीं... २

ध्यान सावळें केव्हां पाहिन,
पाहिन केव्हां प्रभु तव लोचन,
मिठि चरणाला केव्हां घालिन, उतावीळ ही उरीं!
दयाघन, आलों मी दारीं... ३

– वाट चालुनी शिणली काया
स्वरहि नुरले गा बोलाया;
भेटशील तूं–तोंवरि राहिन उभा पायरीवरी
दयाघन, आलों मी दारीं...

* * *

## महात्माजींस

त्रिवार मुजरा तुम्हां गांधिजी !
त्रिवार मुजरा घ्या हो !
युगायुगांतुन नांव चिरंतन
गर्जत तुमचें राहो !

हिंदभूमिचे थोर पुत्र तुम्हि
जीवन आम्हां दिधलें
अपुलें जीवन अर्पुनि कणकण
सुखि आम्हांला केलें

हरिजन सारे उद्धरिले तुम्हि,
हरि येउनियां जगतीं
माथ्यावरती तुम्हीं घेतली
दलिताघरची माती !

तुम्हीं आणिलें स्वातंत्र्याचें
अमृत आम्हांसाठीं
तुम्हीं शिकविली सत्य, अहिंसा
तुम्हीं शिकविली शांती !

सकळ जनांच्या कल्याणास्तव
निशाण धरिलें होतें,
ख्रिस्ता–बुद्धापरी वंद्य तुम्हि
झालां अखिल जगातें !

हृदयाच्या मंदिरीं जागवूं
तुमची स्फूर्ति, मूर्ती,
त्रिखंडांत गाजवूं गांधिजी !
तुमची मंगल कीर्ती !

हिंदपुत्र अम्हि, करितों मुजरा,
त्रिवार मुजरा घ्या हो !
युगायुगांतुन नांव चिरंतन
गर्जत तुमचें राहो ! !

* * *

ललकार ( संचलन-गीत )

ललकार – ललकार – ललकार
वाऱ्यावरती ध्वज हा फडके, करीतसे ललकार !
" जय हिंद, जय हिंद " –करीतसे ललकार !

स्वातंत्र्याचा — करित पुकार
हिंदभूमिचा — करित पुकार
प्रियजननीचा — करित पुकार
सर्व दिशांना, ध्वज हा आमुचा, करितो जयजयकार
ललकार – ललकार ! १

सह्याद्रीच्या शिखरांवरती
स्वातंत्र्याची ज्योत जागती
ही गगनींची वीज चमकती
मनांत अमुच्या—ही लखलखती—ही लखलखती धार !
ललकार – ललकार ! २

उंच हिमालय उत्तरेकडे
सागर गर्जे दक्षिणेकडे
धनधान्याचे मळे चहुंकडे
मधून वाहे—या भूमींतुन – प्रिय गंगेची धार,
प्रिय कृष्णेची धार,
ललकार – ललकार ! ३

पुढें पुढें हा ध्वजहि फडफडे
पुढें पुढें पाऊल हें पडे
क्षितिज नवनवें पुढें उलगडे
नवीन किरणें – नवीन गाणें – नव्या युगाचे स्वार
गाती, नव्या युगाचे स्वार
ललकार — ललकार ! ! ४

* * *

## नवें पाणी

आलें नवें नवें पाणी !
उसळत, घुसळत, फेंसाळत जळ धांवे दाहि दिशांनीं !

ग्रीष्म संपतां, मृगापरी ‘ मृग ’ धांवत हा आला
घेउनी मेघांच्या माला—
कलाबतूची वीज चमकते ज्यांवर थरथरुनी
आलें नवें नवें पाणी !

उदासवाणी पाहुनि अवनी वरुणा ये कणव
कृपेचा करि तो वर्षाव
कोसळलें जळ वरुनि पृथ्विवर धाराधारांनीं
आलें नवें नवें पाणी !

तप्त गिरीवर, तप्त दरीवर शिडकावा होतां
तोषली वसुन्धरा माता
समाधान-उद्गार बोलती सुगन्ध मातींतुनी !
आलें नवें नवें पाणी !

नदिनाल्यांना पूर लोटला तुडुंब चाले जळ
तयाची अवखळ हो खळखळ;
दुथडी भरल्या गोकुळांतल्या ‘ त्या ’ यमुनेवाणी !
आलें नवें नवें पाणी !

हें नवजीवन, हें संजीवन, ये इहलोकांत
नवतिची नवी ऋचा गात
मृत्युलोकची कळा पालटे, पृथिवी हो तरुणी !
आलें नवें नवें पाणी !

किल्मिष, कंटक, चिखल मातला पात्राच्या पोटीं
तयाला जळ हें देइ गती !
समतेची जणुं लाल ध्वजा ही राही फडफडुनी !
आलें नवें नवें पाणी !

पायदळींचीं दडलीं बीजें येतिल तरतरुनी
धुमारे तणारेहि फुटुनी
' सस्यश्यामला सुजला सुफला ' होइल हो धरणी !
आलें नवें नवें पाणी !

उसळत, घुसळत, फेंसाळत जळ धांवे दाहि दिशांनीं
आलें नवें नवें पाणी !

* * *

## वठलेल्या वृक्षास

हे वठल्या वृक्षा ! अजुनी राहसी उभा कां ?
जीवनरस सरला – सरला, नाकळे तुला का ?
येईल पुन्हां मधुमास
विश्वाला फुलवायास
पालवेल शाखा, अपुली, स्वप्न हें मनीं कां ?
कोकिळा मधुर रसवाली
गाईल तुला भूपाळी
मन हळूच फुलवित जाइल, आस अंतरीं कां ?
कीं – शिणला कोणी पांथ
छायेंत होउनी शांत
देईल दुवा दो ओठीं तो:च ऐकणें कां ?
हृदयाशीं किलबिलणारीं
शिरिं घेउनि बाळें सारीं
एकवार डोलायाचें धुन्द मनानें कां ?
क्षण गेले रे ! ते गेले !
मधुकलश रिकामे झाले !
रस सगळा सरला – सरला, अजुनि नाकळे का ?
कीं होउनि खंडविखंड
अग्नीचे फुलवित कुंड
सेवंत जिणें संपावें – हेंच वांच्छिसी का ?

* *

## दिंडी निघाली माघारीं

[ पंढरपुरीं, यात्रेच्या वेळीं दिंडी घेऊन गेलेले वारकरी, द्वादशी झाल्यावर परत आपापल्या गांवीं निघतात. परततांना नगर-प्रदक्षिणा करून वेशीजवळ असलेल्या काळ्या मारुतीच्या देवळाशीं थांबतात. तेथें मारुतीचा अभंग म्हणून, तेथूनच विठ्ठल-मंदिराच्या शिखराचें दर्शन घेतात व निघतात.... ]

आतां परतली वारी
दिंडी निघाली माघारीं !
म्हणा वेशीशीं अभंग,
दूर उभा पांडुरंग
घ्या रे कळस-दर्शन
मनीं बाळगीत खूण
पाय वळेना मागुता,
पायीं विठ्ठलाच्या गुंता !
हात जोडितो जोडितो,
पाय ओढेना, ओढितो
एक एक क्षण मागें
जोडी संसाराचे धागे,
पुन्हा संसार-भोंवरा
फिरवील गरागरा;
विठू राहे भीमातीरीं—
दिंडी निघाली माघारीं !

* * *

## आला संतांचा मेळा

आला संतांचा मेळा ।
चलारे जाऊं पंढरिला– ॥

आले ज्ञानेश्वर संत । ज्यांनीं चालविली भिंत
त्यांनीं लिहिली ज्ञानेश्वरी । सारी दुमदुमली पंढरी
संगें मुक्ताई बालिका । आले गोरोबा काका
आला संतांचा मेळा । चला रे जाऊं पंढरिला ! १

आले नामदेव संत । वीणा खांद्यावरि घेत
करिती कीर्तन देवाचे । पुढती पांडुरंग नाचे !
चाले पुढें जनी दासी । ओव्या गात विठ्ठलासीं
आला संतांचा मेळा । चला रे जाऊं पंढरिला ! २

आले पैठणचे संत । साधुमहाराज एकनाथ
कडेवरि महाराचें मूल । भोंवतीं जमले गोपाळ
हातीं भागवत ग्रंथ । चालले ‘ भारुड ’ हे गात–
आला संतांचा मेळा । चला रे जाऊं पंढरिला ! ३

चालले तुकाराम संत । गजर हरिनामाचा करित
वाजती मृदुंग अन् टाळ । भोंवतीं भक्तांचा घोळ
लावा देवाचा बुक्का । चला रे, मागें राहूं नका !
आला संतांचा मेळा । चला रे जाऊं पंढरिला ! ४

आले रामदास संत । 'जयजय रघुवीर–' म्हणत
"मराठा तितुका मिळवावा । मराठी धर्म वाढवावा"
वाढवा तेजस्वी बाणा । करिती सावध सर्वांना...
आला संतांचा मेळा । चला रे जाऊ पंढरिला ! ५

—जमले संत वाळवंटीं । जाहल्या सर्वांच्या भेटी
म्हणती अभंग देवाचे । चंद्रभागाही मग नाचे !
पुंडलिक देवळांत बसले । तेही धांवुनिया आले...
आला संतांचा मेळा । चला रे जाऊं पंढरिला ! ६

* * *

## मंत्र पुष्प

[ कांहीं अभंग ]

### १. नंदादीप :

हृदयाची माझ्या सुंदर समई
उजळिली मी ही जीवेभावें
अनन्य भक्तीचें ओतियेलें घृत
आजन्म संतत पुरावेसें
ज्ञान कर्म यांच्या वळूनिया वाती
तेथ मी सांगाती ठेवियेल्या
दुष्ट वासनांचा थांबवाया वारा
विवेकाच्या द्वारा उभवीलें
दिव्य दर्शनाच्या देउनी प्रकाशा
नन्दादीपा ईशा ! तेववावें !

२. तुझी स्मृति :

प्रकाश खेळतां अवतीं भंवतीं
पांखराचे चित्तीं भय नाहीं
सायंछाया परी वावरूं लागतां
घरट्याची चित्तां ओढ लागे
मार्गांमाजी बाळ हंसतें खेळतें
कशाचीहि त्यातें स्मृती नाहीं
मात्र चुकोनिया लागतांच ठेंच
शब्द मुखीं येच ' आई ' असा
देवा ! तुझी स्मृति व्हावयाचा दिन
येणार कोठून—कसा, केव्हां ?

३. बोलणें तें फोल :

माझा मीच देवा ! चुकोनीया वाट
केवढा बोभाट करीतसे
निर्मूनिया अग्नि दिला आम्हां हातीं
उजूहीन रीती घ्यावा आम्ही
तुझ्या लौकिकाला आणिली मी लाज
न घडतां काज पामराचें
थोर तुझी कृपा,— मानवाचा जन्म
दिलास परम उदारा तूं !
आतां कोण्या परी तूज लावूं बोल
बोलणें तें फोल व्हावयाचें !

४. कशासाठीं :

कशासाठीं केला एवढा अटाट
माझी मज वाट सांपडेना
वृथा वाटे झाली सारी धांवपळ
अंतरींची कळ मरेचिना !
पाठींचा हा भार ठेवूनिया दूर
वाटे पोटभर रडूं ऐसें
परी मन—अश्रू टिपावें स्वतांच
दावावी लालूच कांहीं नवी !
आणि पुन्हां उरीं फुटेतों फुटेतों
धावावें दिसतो नेम हाच ! !

५. जेव्हां :

जेव्हां भयभीत होतें हें अंतर—
तेव्हां विश्वम्भर ! ध्यातों तूज
जेव्हां पाप कांहीं आचरि ही काया—
पायापाशीं तुझ्या येतों देवा
जेव्हां न सुखाचा लाभे मज बिन्दू—
तुज दयासिन्धू आठवीतों
कुमार्गासी जेव्हां चित्त घेई ओढ—
सत्कर्मांची जोड प्रार्थितों मी
जेव्हां हो कर्तव्य-सिद्धि-समाधान—
नैवेद्य म्हणून समर्पीतों !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. ११२३६

६. मागणें :

मानवरूपाचें देणें देऊनिया ।
मज प्रभुराया ! धन्य केलें ॥
सत्य वा असत्य जाणाया सत्वर ।
बुद्धीचें भांडार दिलें हातीं ॥
काय तुजपाशीं मागायाचें आतां ।
वर दीनानाथा, हाच देई ॥
अनाथाहुनीही अनाथ जे दीन ।
प्रिय बन्धुजन दास तुझे ॥
देह तयांसाठीं झिजो सर्वकाळ ।
ऐशी तळमळ लागो मज ॥

७. संसाराचें ओझें :

संसाराचें ओझें घेऊनिया पाठीं
आत्मसुखासाठीं धांवतों मी
आशेच्या शृंखला पायीं खळाळती
परतंत्र वृत्ती जाणवीती
सौख्याचा आभास जीवा दावी गोडी
नाशिवंत कुडी विसरलों
स्थिरचरांतरीं, सुखदुःखान्तरीं
विश्वंभर हरी एक राहे
जीवांच्या सेवेंत घडो तुझी सेवा
साक्षात्कार व्हावा तुझा यांत !

८. आतां मज शीव दूर नाहीं :

पदोपदीं मज घायाळ करिती
खडेकांटे किती अगणित
अवघडे माथा भार हा वाहून
जीव व्याकळून जाई माझा
परी तूं अनंतरूपें ठायीं ठायीं
उभा पाणपोई घालोनिया
प्रेमाचें आकंठ करोनिया पान
जीवाची तहानभूक निवे
हरी पाठीराखा बाळगीतो कीव
आता मज शीव दूर नाहीं

९ मध्यावरी :

मध्यावरी आलों पोहत पोहत
आतां थोडे हात थकलेच !
सवंगडी कांहीं पुढें-पुढें गेले
अन् कांहीं राहिले कुठें मागें
पाण्यांतच केव्हां चढे नवें पाणी;
कुठें कांटे-फणी बोचताहे
उरीं मात्र आहे सांठला आनंद
पैलतिरीं देह पोंचल्याचा
सद्भाव-श्रीकृष्ण टोपलींत माझ्या
जातों मी देवाच्या गांवाकडे !

१०. मंत्रपुष्प :

यथामति देवा ! पूजन मीं केलें
न्यून तें पुरतें करुनि घे
फूल ना फुलाची वाहिली पाकळी
सुगंधाची कळी मानी तिज !
रांधिलें जें मिठा–शर्करेवांचून
गोड हें पक्वान्न मानावें, जी !
जसा दिला देह तसें केलें कर्म
बुजवीत वर्म मनाचें या !
ठेवितों हा आतां पायीं जड माथा
आतां माझी चिंता तुजकडे ! !

## ११. देव दयाळू आहे :

देव दयाळू आहे ! ध्रु०

भावजळाचा निर्झर कोठें—
पाहे झुळझुळताहे ! १

कृपा तयाची जळीं स्थळीं तव
रक्षण रे, करताहे २

वात लावुनी निरांजनाची,
वाट गड्या तूं पाहे ! ३

दैव उजळतां, प्रसाद मिळतां
कोण उपाशी राहे ? ४

देवकृपेचे कळे उमलतां
परिमळ दरवळताहे ! ५

* * *

(५५) मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
वि:
अनुक्रम
नों: दि:
क्रमांक

## प्रार्थना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ११२५४

तुझिया चरणीं    हेंच मागायाचें
दैन्य या मनाचें    नष्ट करी

सहज भोगाया    सुखदुःखें माझीं
सर्वकाळ राजी    असावें मीं

प्रेम माझें व्हावें    सर्वांत विलीन
अहंकारहीन    मज करीं

अनाथ, अपंग    माझें म्हणावें मीं
तयांच्याच कामीं    देह झिजो

गर्विष्ठांपुढें ना    लवो कधीं मान
स्वत्व स्वाभिमान    उंच राहो

पंकामाजी पद्म    तेवीं माझें चित्त
निर्मल, उन्नत    सदा राहो

नित्य शुद्ध होवो    ऐसें तन मन
तुज समर्पण    करावया !

* * *

[ रवींद्रनाथांच्या कवितेवरून स्वैर रूपांतर ]

* * *

वि. म. कुलकर्णी
यांचें
काव्यवाङ्मय :

१. विसर्जन.
२. पहांटवारा.
३. कमळवेल.
४. आश्विनी.

— बालगीतें.

१. छान छान गाणीं.
२. फुलवेल.
३. ललकार.

* * *

REFBK-0011234
REFBK-0011234